परिवहन समितीच्या शुक्रवार दि. 16/03/2018 रोजी दुपारी 12:00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सदस्य

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 3 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 4 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 5 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 6 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 7 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 8 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 9 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 10 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 11 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |

अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 5 | श्री. विरेन्द्र घनश्यामदास कुकरेजा<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य | सदस्य |

उपस्थित अधिकारी

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. शिवाजी जगताप | परिवहन व्यवस्थापक |
| 2 | श्री. हरिश दुबे | निगम सचिव |

मा.सभापती, यांनी परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

श्री.प्रविण भिसीकरः–मा.सभापती महोदय, मागच्या बैठकीमध्ये काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते तर काही उपप्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यावर मा.सभापती

महोदयामार्फत रूलिंग सुध्दा देण्यात आले होते त्यामुळे विषयपत्रिका घेण्याआधी त्यावर चर्चा करण्यात यावी.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):— मा.सभापती महोदय, बसेसच्या स्वच्छतेच्या बाबतीत जो प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, बसेसची स्थिती अत्यंत वाईट अवस्थेत असून बसेस स्वच्छ ठेवण्याच्या बाबतीत सर्व ऑपरेटर यांना सक्त सुचना दिल्या आहेत. कडक सुचना देण्याच्या व्यतिरिक्त दंडात्मक कार्यवाही सुरू केली आहे. त्यानंतर एक भंगारचा प्रश्न होता, त्यामध्ये एक उप समिती गठीत करावयाची होती ती प्रोसेस अंतिम टप्प्यात आहे ती निश्चित झाल्यानंतर आपण एक्प्रेशन ऑफ इन्ट्रेसची प्रक्रिया पंधरा दिवसात होणे अपेक्षित आहे. मागच्या बैठकीमध्ये भत्त्याच्या बाबतीत विषय होता त्या बाबतीत प्रशासकीय अधिका—यांनी सांगितले की नियमात बसत नाही. या व्यतिरिक्त अत्यंत महत्वाचा प्रश्न असा होता सध्या स्थितीत 4 डेपो सुरू आहेत आणि अतिरिक्त डेपोची आवश्यकता आहे. त्या विषयी सुध्दा जेवढे प्रपोजल जागेच्या बाबतीत आले आहेत त्यापैकी तीन—चार प्रस्तावीत जागेवर सुरू करणार आहे.

श्री.प्रविण भिसीकर:—मा.सभापती महोदय, मा. सदस्य श्री.साठवणे यांनी बसेसच्या स्वच्छतेच्या संदर्भात आतापर्यंत किती दंडात्मक कार्यवाही केली असा प्रश्न उपस्थित केला असता बसेस स्वच्छतेच्या संदर्भात 10 डिसेंबर 2017 नंतर दंडात्मक कार्यवाही सुरू केली आहे असे सभेत सांगण्यात आले आणि याबद्दल पुढच्या बैठकीत माहिती सांगणार होते. किती दंडात्मक कार्यवाही झाली? या विषयाच्या अनुषंगाने विचारणा करीत आहे. दुसरे, जे डेप्युटेशनवर अधिकारी नेमण्यात आले त्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा परिवहन विभागाला व्हावा असा त्यामागचा मानस होता. त्या अनुषंगाने कुठे कुठे, कोणता फायदा झालेला आहे आणि विभागाचा तोटा किती कमी झाला आहे त्याची सविस्तर टिप्पणी मा.सदस्यांना द्यायला पाहिजे.

श्री.नितीन साठवणे:— मा.सभापती महोदय, एस.टी.महामंडळाला बस सेवेत तोटा होत आहे. त्याकरिता ते तोटा दूर करण्याकरिता उपाययोजना राबवित आहेत त्याप्रमाणे आपण काही उपाययोजना करू शकतो काय? ज्यामुळे महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचा तोटा कमी होवू शकेल.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):— मा.सभापती महोदय, 6 महिन्यामध्ये आपण ज्या 50—52 फे—या सुरू केल्या होत्या त्यातून मिळणारे उत्पन्न कमी होते. कमी उत्पन्न असणा—या फे—या आपण कमी करणार. त्यातील काही फे—याचा अभ्यास करून आपण त्या फे—या रद्द केल्या आहेत.

श्री.प्रविण भिसीकर:—मा.सभापती महोदय, कमी उत्पन्न येते म्हणून त्या फे—या रद्द करणे हा आपला काही मानस नाही. तोटा कमी येतो म्हणून फे—या कमी करावयाच्या असे नाही. जनतेला आपल्याला सेवा द्यावयाची आहे. एका व्यक्तिला बसची आवश्यकता असेल तर एका व्यक्तिसाठी बस राहिली पाहिजे. डेप्युटेशनवर जे अधिकारी घेतले आहे त्यांनी आपल्या प्रणालीमध्ये कोणती सुधारणा आणली आहे. तसेच पहिल्या बैठकीमध्ये आपण म्हटले होते की ज्या ठिकाणी बस स्टॉप आहे त्या ठिकाणी बसचे वेळापत्रक लावण्यात येतील परंतु अद्यापही लावण्यात आले नाही. या अनुषंगाने मां.सदस्यांना चार्ट देण्यात यावा, कुठली बस, किती वाजता

कुठल्या स्टॉपवरती जाते. जेणेकरून समिती सदस्यांना त्यांच्या एरियातील वाहतुकीचा अभ्यास करता येईल आणि त्यावर आपले सजेशन देता येतील. त्या सजेशनची अंमलबजावणी झाली पाहिजे. सभापती महोदय आपल्याला विनंती करतो कि, आपण आदेश दयावे 10–15 दिवसात प्रत्येक स्टॉपवरती बसेसचे वेळापत्रक लागले पाहिजे.

श्री.नितीन साठवणेः– मा.सभापती महोदय, बस स्टॉपवर बस उभी न करता रस्त्याच्या मधोमध उभी केली जाते ज्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते याकडे सुध्दा लक्ष देण्याविषयी सांगण्यात यावे.

सभापतीः– उप सभापती श्री.भिसीकर यांनी सुचना केल्याप्रमाणे 10–15 दिवसात बस स्टॉपवरती बसेसचे वेळापत्रक लावण्यात यावे. त्याची यादी समिती सदस्यांना देण्यात यावी. जर बस स्टॉपवरती वेळापत्रक लागले नाही तर त्या दिवसापासून प्रोग्राम मॅनेजरवर चक्रवाढ व्याजाप्रमाणे पेनॉल्टी लावण्यात यावी.

श्रीमती अर्चना पाठकः– मा.सभापती महोदय, साल भर हो गया है मैने 5 जगह बस स्टॉप खडे करने के लिए बताया था परंतु एकही जगह खडा किया गया है ।

अधिकारीः– मा.सभापती महोदय, ज्या ठिकाणी जागा क्लिअर होत्या त्या ठिकाणी बस स्टॉफ केले आहे. दोन–तीन जागेकरिता वाहतुक विभागाकडे पत्र दिले आहे. टेंडरची जी काही प्रोसेस झाली आहे ती वाहतुक विभागामार्फत झाली आहे.

सभापतीः– आधी वाहतुक विभागाकडे बस शेल्टरचा विषय असल्यामुळे पुढच्या बैठकीत जे संबंधित अधिकारी असतील त्यांना बोलविण्यात यावे.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप)ः– मा.सभापती महोदय, 158 बस स्टॉप आहेत. नवीन धोरणानुसार स्मार्ट बस स्टॉप लावण्याचे प्रस्तावित आहे. एलएनटी मार्फत स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत करणार आहे. त्याची प्रगती ऑगस्ट महिन्यापर्यंत व्हायला पाहिजे. त्या कामाला गती येत नाही. स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत त्या कामाला वेळ लागणार आहे. बस स्टॉप वरती वेळापत्रकाचे बोर्ड लावण्यात येतील.

श्री.प्रविण भिसीकरः–मा.सभापती महोदय, स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत एलएनटी मार्फत 158 बस स्टॉप उभारण्याचे प्रस्तावित आहे त्याला किती वेळ लागणार आहे. वर्षभराच्या आत ते बोर्ड लावावयाचे होते तुम्ही आता किती दिवसात लावणार आहे ते सांगावे.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप)ः– मा.सभापती महोदय, या प्रक्रियेला दोन ते अडीज महिने लागणार आहे. साधारणतः 400 ते 500 बस थांब्यावर बोर्ड लावावयाचे आहे. त्याची परिपुर्तता पुढच्या बैठकीत निश्चित देणार आहे.

श्री.प्रविण भिसीकरः–मा.सभापती महोदय, या अनुषंगाने चुक अशी झाली आहे. आधी 158 बस स्टॉप वरच्या जाहिरातीसाठी ज्या कंपनीला काम दिले होते त्या जाहिरात कंपनीचे काम रिनिव्हलकरिता स्थायी समितीकडे आले. ते काम रिनिव्हल व्हायच्या आधी जर केले असते तर आपल्याला प्राफीट झाला असता. कंपनीला बस स्टॉपवरती जाहिरात बोर्डच्या मागे, समोर,

आणि बाजूला जाहिरात करावयाची आहे. जर आपल्याला एका साईडचा बोर्ड मिळाला असता तर त्यावर आपण बसेसचे वेळापत्रक टाकू शकलो असतो. याच्यासाठी प्रेझेन्स ऑफ माईंड लागणार? हे कोण वापरणार आहे.

श्री.नितीन साठवणेः–मा.अध्यक्ष महोदय, नवीन योजना आणण्याचे काम कुणाचे आहे तर विभागात असलेल्या अधिकारी, कर्मचा–यांचे आहे. मागच्या बैठकीत मी बोललो होतो की एसटी महामंडळ तोटा दूर करण्याकरिता उपाययोजना राबवित आहेत त्याप्रमाणे आपण काही उपाययोजना करू शकतो काय? ज्यामुळे महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचा तोटा कमी होवू शकेल.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):– मा.सभापती महोदय, आपण उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आणि तोटा कमी करण्याच्या दृष्टीने विभागाचा स्टॉफ उत्पन्नाच्या स्तोत्राची तपासणी करणार आहे. तपासणीची प्रक्रिया प्रगत करणार आहे. मा.सदस्य यांनी सांगितल्याप्रमाणे सगळया बस स्टॅापवरती बसचे वेळापत्रक लावावयाचे आहे. आपण संपुर्ण नागपूर शहरामध्ये ट्रेस केला असता जवळपास 550 बस स्टॉफ आहेत. शहराच्या हद्दीतच नाही तर शहराच्या बाहेर सुध्दा आहेत.

सभापतीः– बस स्टॉप वरती वेळापत्रकाचे बोर्ड लावण्याकरिता युआय काढण्यात यावा.

<u>ठराव क्रमांक 35</u> :– नागपूर शहरातील वाहतुकीचा प्रवासी थांबा ठरविण्याची संपूर्ण कार्यवाही ही परिवहन विभागामार्फत करण्यात येते. परंतु ठरविण्यात आलेल्या थांब्यावर प्रवासी निवारा बांधण्याकरीता वाहतुक विभागामार्फत निश्चिती करण्यात येते, विचार करता बस थांबे कसे व कुठे असावे, याबाबत मंजूरीचे संपुर्ण अधिकार परिवहन विभागाअंतर्गत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 36</u> :– परिवहन विभागाअंर्तगत संचालित शहरबस तात्पुरते करीता असलेल्या ३६२ डिझेल बस व २० ग्रीनबस जाहीराती लावण्याकरीता Expression of Intrest वर्तमान पत्रात जाहीरातीद्वारे दर मागवून जाहीरात करण्याचे Rights संबधीतांना देण्याकरीता वर्तमानपत्रात जाहीरात देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 37</u> :– श्री. रामराव मातकर, अतांत्रिक पर्यवेक्षक यांना दि. ०९/०३/२०१८ पासुन दि. ०८/०९/२०१८ पर्यंत या ०६ महिन्याच्या कालावधी करीता दरमाह रू. २२,०००/– या मंजूर मानधनावर मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एक महिन्याची मुदतवाढ देवून पंधरा दिवसाच्या आतमध्ये आकृतीबंधाचा विषय घेवून सर्व प्रस्ताव समिती समक्ष ठेवण्यात यावे तसेच मुदतवाढीचे कोणतेही प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्यात येवू नये या मा.सदस्य श्री.प्रविण भिसीकर आणि समिती सदस्यांनी केलेल्या सुचनेस एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 38</u> :— श्री. सुकीर सोनटक्के, वाहतुक व्यवस्थापक यांना दि. ०९/०३/२०१८ पासुन दि. ०८/०९/२०१८ पर्यंत या ०६ महिन्याच्या कालावधी करीता दरमाह रू. ३५,०००/— या मंजूर मानधनावर मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एक महिन्याची मुदतवाढ देवून पंधरा दिवसाच्या आतमध्ये आकृतीबंधाचा विषय घेवून सर्व प्रस्ताव समिती समक्ष ठेवण्यात यावे तसेच मुदतवाढीचे कोणतेही प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्यात येवू नये या मा.सदस्य श्री.प्रविण भिसीकर आणि समिती सदस्यांनी केलेल्या सुचनेस एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 39</u> :— सहायक लेखापाल या पदाची निर्मिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम क्र. ३४८ व ३४९ अन्वये करण्यात आलेली होती. सदर पदाच्या निर्मिती परिवहन समिती व महानगरपालिकेची मंजूरात असणे आवश्यक आहे.

सदर पदाची मंजूरी करीता विषय महानगरपालिकेच्या महासभेसमक्ष पाठविण्यात तसेच महानगरपालिकेची मंजूरात प्राप्त होईल या पुर्व धारणेवर श्री. अश्विन पाचपोर, सहायक लेखापाल यांना दि. २०/०३/२०१८ पासुन दि. १९/०६/२०१८ पर्यंत या ०३ महिन्याच्या कालावधी करीता दरमाह रू. २०,०००/— या मंजूर मानधनावर नियुक्ती देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एक महिन्याची मुदतवाढ देवून पंधरा दिवसाच्या आतमध्ये आकृतीबंधाचा विषय घेवून सर्व प्रस्ताव समिती समक्ष ठेवण्यात यावे तसेच मुदतवाढीचे कोणतेही प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्यात येवू नये या मा.सदस्य श्री.प्रविण भिसीकर आणि समिती सदस्यांनी केलेल्या सुचनेस एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 40</u> :— श्रम अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी या पदाची निर्मिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम क्र. ३४८ व ३४९ अन्वये करण्यात आलेली होती. सदर पदाच्या निर्मिती परिवहन समिती व महानगरपालिकेची मंजूरात असणे आवश्यक आहे.

सदर पदाची मंजूरी करीता विषय महानगरपालिकेच्या महासभेसमक्ष पाठविण्यात तसेच महानगरपालिकेची मंजूरात प्राप्त होईल या पुर्व धारणेवर श्री. अरूण पिपुरडे, श्रम अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी यांना दि. ०९/०३/२०१८ पासुन दि. ०८/०६/२०१८ पर्यंत या ०३ महिन्याच्या कालावधी करीता दरमाह रू. ३५,०००/— या मंजूर मानधनावर नियुक्ती देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एक महिन्याची मुदतवाढ देवून पंधरा दिवसाच्या आतमध्ये आकृतीबंधाचा विषय घेवून सर्व प्रस्ताव समिती समक्ष ठेवण्यात यावे तसेच मुदतवाढीचे कोणतेही प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्यात येवू नये या मा.सदस्य श्री.प्रविण भिसीकर आणि समिती सदस्यांनी केलेल्या सुचनेस एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 41</u> :— महाराष्ट्र शासन तेजस्विनी योजने महानगरपालिका स्वतंत्र बस व्यवस्थेकरीता ईलेक्ट्रीक मिडी बसेस घेणे व सदर प्रकल्पाकरीता मे. डी. आर. ए. यांना प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापतीः— महाराष्ट्र शासन तेजस्विनी योजने महानगरपालिका स्वतंत्र बस व्यवस्थेकरीता ईलेक्ट्रीक मिडी बसेसकरिता शासनाकडून निधी मिळालेला आहे. या बसेसची खरेदी केल्यानंतर या बसेसचे उद्घाटन मा. केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी,मा. महापौरजी, परिवहन समिती महिला मा.सदस्य, महिला आयपीएस अधिकारी, जेष्ठ महिला, गरीब शिक्षित मुली, दिव्यांग मुली यांच्या हस्ते करण्यात येईल. या अनुषंगाने महिला मा.सदस्यांना सूचना आहे त्यांनी त्यांच्या परिसरातील मेरिटमध्ये आलेल्या गरीब घरातील मुली, नामवंत सामाजिक क्षेत्रातील महिला यांच्या हस्ते उद्घाटन करावे. ही बस चालविण्याकरिता महिला चालक आणि कंडक्टर महिलेची नियुक्ती व्हावी या अनुषंगाने विभागाने प्रयत्न करावेत. जेणेकरून समाजात चांगला संदेश जावून समाजातील युवतींचा आत्मविश्वास वाढेल या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावे. विषयपत्रिकेवरील जे विषय आर्थिक बाबींशी संबंधित आहेत ते विषय स्थगित ठेवण्यात येवून त्याकरिता दि.२१.०३. २०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता परिवहन समितीची बैठक लावण्यात येते. या बैठकीत आर्थिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात येईल. या बैठकीत नियुक्त केलेले ऑपरेटर यांना सुध्दा बोलाविण्यात यावे.

<u>ठराव क्रमांक 42</u> :— परिवहन लेखाविषयक कामा करीता श्री. विनय भालचंद्र भारद्वाज, लेखाधिकारी म्हणुन नियुक्त असुन त्यांना दि. ०९/०३/२०१८ ते ०८/०९/२०१८ पर्यंत या सहा महिन्याच्या कालावधी करिता दर महा रु ३००००/— (जुने मंजुर मानधन रु.२२०००/—) या वाढीव मानधना वर नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकदा मानधन वाढविल्यानंतर शासन निर्णयानुसार चार वर्षापर्यंत मानधन वाढविता येत नाही. मानधन वाढीच्या या विषयास मा. सदस्य श्री.प्रविण भिसीकर तथा समिती सदस्यांनी एकमताने आक्षेप नोंदविला.

सभापतीः—सभेची विषयपत्रिका मा.सदस्यांपर्यंत वेळेवर पोहचत नाही असा समिती सदस्यांचा मानस लक्षात घेता विषयपत्रिका निघाल्यानंतर मा. सदस्यांपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी विभागातील अधिकारी श्री. प्रकाश फुले यांच्याकडे देण्यात येते. परिवहन समितीचा अभ्यास दौरा दिल्ली आणि जयपूर या शहराकरिता भेट देण्याकरिता निश्चित करण्यात आला असून पर्यवेक्षक म्हणून श्रम अधिकारी श्री.अरूण पिंपुरूडे यांची नेमणुक करण्यात येते. परिवहन व्यवस्थापकांनी मा.समिती सदस्यांशी चर्चा करून तारीख निश्चित करावी.

<u>ठराव क्रमांक 43:—</u> आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळ ाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर